तरुण भारत संवाद

# वाठारला सायबर क्राईम जनजागृती कार्यक्रम



वाठार : मुकादम विद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रथमेश खंडागळे व पद्मनाभ माळवदे.

वार्ताहर
वाठार

आजच्या डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. मात्र याबरोबर सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यार्थ्यांनी सजग राहून डिजिटल साधनांचा सुरक्षित वापर करावा, यासाठी दानशूर बंडो गोपाळ मुकादम विद्यालय, वाठार (ता. कराड) येथे सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड येथील सायबर शक्ती क्लबमार्फत आणि क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षासाठी सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत नुकताच हा कार्यक्रम झाला.

प्रथमेश खंडागळे व पद्मनाभ माळवदे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षाविषयक सविस्तर मार्गदर्शन केले. संशयास्पद लिंक, मोफत गिफ्टचे आमिष दाखवणारे संदेश, बनावट बँक कॉल्स किंवा ओटीपी फसवणूक या धोक्यांपासून वाचण्यासाठी नेहमी जागरूक राहणे महत्त्वाचे आहे. सुरक्षिततेसाठी स्ट्राँग पासवर्डचा वापर, दोन–स्तरीय प्रमाणीकरण, अँटीव्हायरस सॉफ्टवेअरचा वापर आणि नियमित डेटा बॅकअप यांचा अवलंब केल्यास अनेक सायबर धोके टाळता येऊ शकतात. वैयक्तिक फोटो, शैक्षणिक माहिती किंवा बँक खात्याशी संबंधित माहिती सोशल मीडियावर शेअर न करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सी. एम. पाटील यांच्यासह शिक्षकांचे सहकार्य लाभले.